| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **CNR NO.** **MHNG100001542018** | दाखल तारीख | : | २५.०१.२०१८ |
| | | नोंदणी तारीख | : | २५.०१.२०१८ |
| | | निकाल तारीख | : | २२.०५.२०२६ |
| | | कालावधी | : | ०८व. ०३म. २७दि. |

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालय, उमरेड
(पिठासीन अधिकारी रा.भा. डोळे )

(पारीत दिनांक २२ मे, २०२६ )

नियमीत फौजदारी खटला क्र. १९/२०१८ निशाणी क्र.५०

उमरेड पोलीस स्टेशन.
गु.र.क्र. १७४/२०१७

अभियोग पक्ष : महाराष्ट्र शासनातर्फे,
पोलीस ठाणे अधिकारी, उमरेड,
ता. उमरेड, जि. नागुपर.

विधिज्ञ : श्री.संदेश काठोके, सहायक सरकारी अभियोक्त

.. विरूध्द ..

आरोपी : १ सौ.मिना ओमप्रकाश सुखदेवे (मयत)

२ मधुकर विठोबाजी लांजेवार
वय : ६८ वर्षे, व्यवसाय : निवृत्त
रा. पाण्याच्या टाकीजवळ, परसोडी, तह.उमरेड, जि.नागपुर

विधिज्ञ : आरोपी क्र. २ तर्फे श्री. व्ही.एन.पाटील

## न्या य नि र्ण य

| | | |
|---|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | : | सन २०१३ ते २४.०३.२०१७ |
| प्रथम खबर दिनांक | : | २४.०३.२०१७ |
| दोषारोप दाखल केल्याचा दिनांक | : | २५.०१.२०१८ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | : | २६.०४.२०१९ |
| पुरावा नोंदविण्यास सुरूवात केल्याचा दिनांक | : | १३.०८.२०१९ |
| न्यायनिर्णयासाठी ठेवल्याचा दिनांक | : | २२.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | २२.०५.२०२६ |
| शिक्षेचा आदेशाची तारीख असल्यास काही ? | : | लागू नाही. |

२. **आरोपींचा तपशिल :**

| आरोपी क्र. | आरोपींचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचा तपशिल | शिक्षा किंवा निर्दोष | शिक्षा कालावधी | खटला चालू असल्याच्या दरम्यान कारागृहात असल्याचा कालावधीफौ.प्र. सं. कलम ४२८ साठी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सौ.मिना ओमप्रकाश सुखदेवे | १०.०४.२०१७ | १०.०४.२०१७ | भारतीय दंड विधान कलम ४२०, ४७१ सहकलम ३४ अन्वये | (मयत) | लागू नाही | लागू नाही |
| २ | मधुकर विठोबाजी लांजेवार | सुचनापत्रा वर सोडले | २५.०१.२०१८ | भारतीय दंड विधान कलम ४२० , ४७१ सहकलम ३४ अन्वये | निर्दोष | लागू नाही | लागू नाही |

३. **अभियोग पक्षाचे साक्षीदार/ बचाव पक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार असल्यास :**

अ. **अभियोग पक्षाचे साक्षीदार :**

| रँक | साक्षीदारांचे नावे | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १ | केशव भाऊराव रामटेके/सा.क्र.१/नि.क्र. १४ | पंच |
| २ | प्रविण मधुकर गाणार/ सा.क्र.२/नि.क्र.२५ | फिर्यादी |
| ३ | नरेश उपासरावजी नंदनवार /सा.क्र. ३/नि.क्र. ३३ | साक्षीदार |
| ४ | सोमेश मतीराम माटे/सा.क्र. ४/नि.क्र. ३५ | साक्षीदार |

ब. **बचाव पक्षाचे साक्षीदार :** निरंक

क. **न्यायालयीन साक्षीदार :** निरंक

४. **अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचे दस्तास निशाणी बाबतची यादी :**

अ. **अभियोग पक्ष :**

| अ.क्र. | दस्त | निशाणी |
|---|---|---|
| १ | जप्ती पंचनामा वरील सही | १५ |
| २ | लेखी तक्रार | २६ |
| ३ | छापील एफआयआर | २७ |

ब. **बचाव पक्ष :** निरंक

क. **न्यायालयीन दस्तास निशाणी :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | दस्तावेजाचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.३९ | आरोपी क्र. २ चे फौ.प्र.सं.कलम ३१३ अन्वयेचे निवेदन. |

ड. **विशेष मटेरियल ऑब्जेक्ट :** निरंक.

५. **<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे</u>** :

फिर्यादी हे वायगाव घोटुर्ली येथे राहतात. त्यांचे दुकान आहे. दि. २२.०८.२०१३ रोजी अर्जदार म्हणून उमरेड तहसील सेतु कार्यालयात, अनुसुचीत जाती चे प्रमाणपत्र बनविण्यासाठी ज्योती मसराम उर्फ मिना मधुकर गाणार हिने स्वतःचे फोटो लावला. शपथपत्र तयार केले. दि.२२.०८.२०१३ ला या महिलेला ओळखतो म्हणून अर्जनविसा ची स्वाक्षरी घेण्यात आली. त्याच कागदावर मिना गाणार या नावाने कागदपत्रावर स्वाक्षरी आहे. नगर परिषद प्राथमीक शाळा, बुधवारी उमरेड या शाळेतुन चौथ्या वर्गाची, बोगस शाळा सोडल्याचा दाखल काढला आहे. त्या अर्जात फिर्यादीचे आई वडीलांचे नाव असा उल्लेख करुन, स्वतःला मुलगी म्हणून दाखविली आहे. वडीलांच्या मतदान पत्राचा पुरावा म्हणून उपयोग केला आहे. सन १९५० चा पुरावा म्हणून कोतवाल पंजी जोडलेली आहे. त्यामध्ये लिला व गोविंदा महार, सप्टेंबर १९४२ चा पुरावा जोडला आहे. फिर्यादीच्या वडीलांचे जात प्रमाणपत्र पुरावा म्हणून जोडले आहे. तसेच शिधा पत्रीका चे झेरॉक्स प्रत, सन २००७ चे निरीक्षण अधिकारी, उमरेड यांची सही आहे. मिना ओमप्रकाश सुखदेवे या नावाने सन २००५ मध्ये शिधा पत्रीकेची नोंद उमरेड तहसील मध्ये कुटुंब प्रमुख म्हणून आहे.

६. दि. १९.०९.२०१६ व १७.१०.२०१६ तहसील कार्यालय उमरेड येथे, लोकशाही दिवशी फिर्यादीने जात प्रमाणपत्र रद्द करण्याकरीता अर्ज दाखल केला होता. तहसीलदार उमरेड यांनी फिर्यादीला लेखी पत्र दिले. त्यांना सुचीत केले की, उपविभागीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधा. त्यानंतर ११.११.२०१६ ला ते उपविभागीय अधिकारी, उमरेड यांना फिर्यादी यांनी लेखी पत्र दिले. त्यांनी फिर्यादीला सुचीत केले की, प्रमाणपत्र रद्द करणे त्यांच्या अधिकार क्षेत्राच्या बाहेर आहे, वरीष्ठ अधिका–यांशी संपर्क साधा. मिना ओमप्रकाश सुखदेवे उर्फ ज्योती मसराम उर्फ मिना मधुकर गाणार हिने फिर्यादीच्या

परिवारातील सदस्य असल्याचा देखावा केला आणि बनावटी कागदपत्र बनविले आहे. त्यामुळे फिर्यादीच्या परिवाराची व शासनाची फसवणुक केली आहे. म्हणून त्यांनी फिर्याद दाखल केली.

७. म्हणून फिर्यादी यांनी सदर घटनेची फिर्याद, उमरेड पोलीस स्टेशनला दाखल केली. उमरेड पोलीस स्टेशनला गु.र.क्र. १७४/२०१७ अन्वये गुन्हा भारतीय दंड विधान चे कलम ४२० व ४७१ सह ३४ अन्वये नोंदविला. या पुढे सोयीचे व्हावे म्हणून भादवी असे नमुद करण्यात येईल. गुन्हा दाखल झाल्यानंतर तपासी अधिकारी यांनी जप्ती पंचनामा केला, साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले, आणि तपासाअंती सबळ पुरावा मिळून आल्याने आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

८. **दोषारोप व आरोपीचे म्हणणे –** दोषारोपपत्र व दस्तावेजांचे अवलोकन केले. माझे सन्मानीय पुर्वाधिकारी यांनी दिनांक २६.०४.२०१९ रोजी आरोपीविरुध्द भा.दं.वि.चे कलम ४२० व ४७१ सह ३४ अन्वये दोषारोप नि.क्र.११ अन्वये निश्चित केले. ते आरोपीस वाचून दाखविण्यात आले, ते आरोपी यांनी नि.क्र. १२ व १३ अन्वये नाकबुल केले. आरोपी यांनी खोटी केस केली आहे, या आशयाचा बचाव घेतला, असे त्यांचे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१३ अन्वयेच्या निवेदना वरुन दिसून येते.

९. खटला प्रलंबीत असतांना आ.क्र. १ सौ.मिना ओमप्रकाश सुखदेवे या मयत झाले. त्यांचे मृत्युचे प्रमाणपत्र नि.क्र. ३१ अन्वये दाखल आहे. न्यायालयाने दि.१४.०३.२०२४ रोजी नि.क्र. १ वर त्याबाबतचा आदेश पारित केला. खटला आ.क्र. १ विरुध्द समाप्त करण्यात आला.

१०. **मुद्दे व निष्कर्ष –** अभियोग पक्षाची बाजू व आरोपीचा बचाव लक्षात घेता मी खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित करुन त्याचा निष्कर्ष कारणमिमांसेसह देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक सन २०१३ ते दि. २४.०३.२०१७ च्या दरम्यान वायगाव घोटुर्ली, उमरेड व उमरेड तहसील कार्यालयातील सेतु व उमरेड तहसील कार्यालयात, दोन्ही आरोपीने समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ खोटे शिधा पत्रीक, शाळा सोडलयाचा दाखला तयार केले व खोटे जातीचे प्रमाणपत्र फिर्यादीच्या वडीलांचे वापरुन शासनाची व फिर्यादीची फसवणुक केली व अप्रामाणीक पणे जात प्रमाणपत्र बनविण्यासाठी प्रवृत्त केले, आणि याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधान **कलम ४२० सह ३४** खाली शिक्षापात्र असलेला अपराध केला ? | **...नाही** |
| २. | उपरोक्त तारीख, वेळी व ठिकाणी दोन्ही आरोपीने समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ आरोपी यांना दस्तावेज हे बनावट असल्याचे माहीत असतांना, आरोपींनी कपटीपणाणे व अप्रमाणीकपणे त्याचा खरा म्हणून वापर केला व फिर्यादीच्या वडीलांचे जात प्रमाणपत्र हे पुरावा म्हणून दाखल केला व त्यांची मुलगी म्हणून अर्जात नमुद केले, बनावट दस्त तयार करुन बनावट जातप्रमाणपत्र तयार केले, आणि याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधान **कलम ४७१ सह ३४** खाली शिक्षापात्र असलेला अपराध केला ? | **...नाही** |
| ३ | काय आदेश ? | **अंतिम आदेशा प्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

११. **<u>मुद्दा क्र. १ व २ साठी</u> :**

१२. अभियोग पक्षाच्या वतीने चार साक्षीदार तपासण्यात आले. आरोपीतर्फे साक्षीदार तपासण्यात आले नाही किंवा इतर कोणताही पुरावा देण्यात आला नाही.

**१३.** अभियोग पक्षाचे पुराव्याचे अवलोकन केले. साक्षीदार क्र.१ यांनी असे कथन केले की, ते नगर परिषद स्वर्गीय गोवर्धनसींग भदोरिया, बुधवारी प्राथमीक शाळा, उमरेड येथे शिक्षक आहे. त्या शाळेमध्ये पोलीस आले. त्यावेळी अरुण वाघमारे मुख्याधापक हजर होते. जप्ती पंचनामावर त्यांची सही आहे. ते नि.क्र. १५ अन्वये अभिलेखावर दाखल आहे. त्यानंतर साक्षीदारास फितुर म्हणून घोषीत केले. तरी सुध्दा त्यांनी अभियोगपक्षास दाद दिली नाही.

**१४.** सा.क्र. २ हे फिर्यादी आहे. त्यांनी असे कथन केले की, ते आरोपींना ओळखतात. दि. २२.०८.२०१३ रोजी घटना घडली. आरोपी मिना सुखदेवे हिने जातीचा दाखला बनविण्याकरीता सेतु कार्यालयात बोगस कागदपत्र सादर केले होते. त्यामध्ये त्यांच्या वडीलांचा मतदानपत्र, शाळा सोडल्याचा दाखला ,शिधा पत्रीका, कोतवाली पंजी, नगर परिषद बुधवारी प्राथमीक शाळा यांच्या चौथ्या वर्गाची बोगस शाळा सोडल्याचा दाखला, तसेच फिर्यादीच्या आईवडीलांचे नाव असलेले बोगस जात प्रमाणपत्र बनवले. माहितीच्या अधिकारात त्यांनी कागदपत्र प्राप्त केले. नंतर चौकशी करुन त्यांनी गुन्हा दाखल केला. नि.क्र. २६ अन्वये लेखी तक्रार दाखल आहे व नि.क्र. २७ अन्वये प्रथम छापील खबर आहे. उलटतपासणीत त्यांनी कबुल केले की, बोगस कागदपत्र तयार करण्याकरता आ.क्र. २ यांचा सहभाग असल्याचे त्यांना दिसून आले नाही. त्यांनी हे देखील कबुल केले की, आ.क्र. २ विरुध्द त्यांची तक्रार नाही.

**१५.** सा.क्र. ३ यांनी असे कथन केले की, घटना घडली त्यावेळी त्या तहसील कार्यालयात कार्यरत होत्या. पक्षकारांनी दस्तावेज आणल्यावर ते तपासणे, जात प्रमाणपत्र व शपथपत्र तयार करणे हे त्यांचे काम होते. आरोपीचे फोटो काढले. त्यांची केस तयार केली. शपथपत्राकरीता त्यांनी आरोपीचे फोटो काढले होते. केस त्यांनी नायब तहसीलदार कडे दिली

होती. पोलीसांनी त्यांचे बयान घेतले होते, असे त्यांनी कथन केले. सदरहु साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आली नाही.

**१६.** सा.क्र. ४ यांनी असे कथन केले की, मिना गाणार हे जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी तहसील कार्यालयात आली होती. घटना सन २०1३ ची आहे. तिला ओळखतो, म्हणून तहसील कार्यालयात शपथपत्रावर त्यांनी सही केली होती. त्यांना मिना गाणारचे शपथपत्र दाखविले. त्यावर त्यांची ओळख म्हणून सही असल्याचे कथन केले. पोलीसांनी त्यांचे बयान घेतले, असे त्यांनी कथन केले. सदरहु साक्षीदाराचा देखील उलटतपास घेण्यात आला नाही.

**१७.** ''आरोपी यांनी खोटे व बनावट दस्त हे खरे असल्याचे भासविले व आ.क्र १ ने जातीचे प्रमाणपत्र तयार केले, फिर्यादीच्या कुटुंबातील सदस्य आहे, असे तिने दाखविले'' हे महत्वाचे तथ्य शाबीत होणे आवश्यक आहे. ते ही संशयाच्या पलिकडे जाऊन तथ्य शाबीत होणे आवश्यक आहे.

**१८.** सा.क्र. १ हे अभियोगपक्षास फितुर झाले. सा.क्र. ३ व ४ यांचा उलटतपास घेण्यात आला नाही. त्यांचा पुरावा अबाधित राहिला. सा.क्र. ३ हे सेतु कार्यालयात काम करीत होते, असे त्यांच्या पुराव्यावरुन दिसून येते. त्यांनी आ.क्र. १ चे फोटो काढले, त्यांचे प्रकरण तयार केले व नायब तहसीलदार कडे दिले, असे त्यांचे कथन आहे. सा.क्र. ४ यांनी आरोपी मिना गाणार हिला ओळख, म्हणून तिच्या शपथपत्रावर सही केली असे त्यांचे कथन आहे. दोन्ही साक्षीदारांचे तोंडी कथन अबाधीत राहीले. कारण सदरहु साक्षीदाराचा उलटतपास घेण्यता आला नाही. यामुळे आ.क्र. १ हिने जातीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तहसील कार्यालयात अर्ज दाखल केला होता. हीच बाब शाबीत होते.

१९. सा.क्र. २ यांनी घटने बाबत कथन केले आहे. नि.क्र. २६ अन्वये त्यांची लेखी तक्रार आहे. नि.क्र. २७ अन्वये छापील प्रथम खबर आहे. साक्षीदार यांनी देखील नि.क्र. २६ व २७ शी सुसंगत असे कथन केले आहे. आ.क्र. १ हिने काय कृत्य केले? हे त्यांनी कथन केले. परंतु, आ.क्र. २ चा त्याच्याशी काही संबंध नाही, अशी त्यांची उलटतपासणी मध्ये कबुली आहे. तसेच आ.क्र. २ विरुध्द त्यांची तक्रार नाही, अशी त्याची कबुली आहे.

२०. अभियोगपक्षाने कोणतेही दस्त शाबीत केले नाही. जप्ती पंचनामा देखील शाबीत झाला नाही. त्यावरील पंच हे फितुर झाले. इतर कोणतेही दस्त हे अभिलेखावर दाखल नाही. गुन्हा हा बनावटीकरण दस्ताबाबतचा आहे. परंतु, कोणत्या दस्ताचे बनावटीकरण केले गेले, व कोणते दस्त बनावट असतांना खरे म्हणून वापरले हे दस्त अभिलेखावर दाखल नाही. महत्वाचे म्हणजे तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केल्याचे दिसून येत नाही. आ..क्र. २ यांचा घटनेशी काही संबंध आहे, याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल नाही. कारण फिर्यादी सा.क्र २ यांची कबुली ही कथन करीत आहे की, आ.क्र. २ चा घटनेशी काही संबंध नाही.

२१. न्यायालयाने भारतीय दंड विधानचे कलम ४२० व ४७१ सह ३४ अन्वये आरोप निश्चीत केला आहे. अभियोगपक्षाने तो पुरावा दाखल केला आहे. त्यामध्ये आरोपींनी अप्रामाणीकपणे किंवा कपटीपणाने ठगवणुक केली किंवा अप्रामाणीकपणे प्रवृत्त केले हे तथ्य शाबीत होणे आवश्यक आहे. कोणतेही तथ्य अभियोगपक्ष हे संशयाच्या पलीकडे जाऊन शाबीत करु शकला नाही. त्यामुळे तथ्ये ही शाबीत करण्यात अभियोग पक्ष यशस्वी ठरलेला नाही. पुरावा सबळ नाही, असे प्रकर्षाने दिसून येते. आरोपींना उपरोक्त गुन्ह्यात गोवण्या सारखा सबळ पुरावा न आल्याने मी मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

## मुद्दा क्र.३ साठी

२२. प्रकरण प्रलंबीत असतांना, मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू केली होती. त्याचा परिणाम जन–जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासून न्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले. सबब मुद्दा क्र. २ साठी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :आदेश:

१. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) च्या तरतुदी नुसार आरोपी क्र.२ मधुकर विठोबाजी लांजेवार यास भा.दं.वि.चे कलम ४२० व ४७१ सह ३४ अन्वयेच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपी क्र. २ चा जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येऊन जमानतदारांना मुक्त करण्यात येते.

३. आरोपी क्र. २ याने फौजदारी संहितेच्या कलम ४३७–अ नुसार रुपये १५,०००/–(अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) नवीन बंधपत्र व जातमुचलका द्यावा.

४. जप्त मुद्देमाल असल्यास, हा अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित केला.**

RAJU BHASKAR DOLE
Judgment
Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2026.05.22 13:04:01 +0530

**उमरेड .** **(रा.भा. डोळे)**
**दिनांक : २२.०५.२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उमरेड**

**<u>: प्रमाणपत्र :</u>**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – आर.ए.देशकर

न्यायालयाचे नांव – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उमरेड.

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक – २२.०५.२०२६

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३